विर्डी बृहत ल.पा योजना, ता. दोडामार्ग, जि.सिंधुदूर्ग या योजनेच्या रु.१४६ कोटी इतक्या किंमतीच्या प्रकल्प अहवालास प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१४/(११३/२०१४)/खारभूमी

मंत्रालय,मुबई-४०००३२

दिनांक:- १६ नोव्हेंबर,२०१७.

<u>पहावे:-</u> शासन निर्णय क्र. लपायो-२००५/३८३/(८६/२००५)/खारभूमी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२, दि. २०.९.२००५.

<u>प्रस्तावना :</u>

महादयी (मांडवी) नदी खोऱ्यातील विर्डी बृहत ल.पा.योजना ता. दोडामार्ग,जि.सिंधुदूर्ग, या योजनेस उपरोक्त शासन निर्णयानुसार रु. ४३.६८ कोटी किंमतीसाठी (दरसूची २००३-०४) मूळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. मूळ प्रशासकीय मान्यतेनुसार धरणाचे बांधकाम विर्डी गावाचे खालील बाजूस सुमारे ३.०० कि.मी. अंतरावर गोवा राज्याच्या सिमेलगत हलतर नाल्यावर प्रस्तावित होते. तद्नंतर प्रकल्पग्रस्तांच्या तीव्र विरोधामुळे व कमीतकमी क्षेत्र जलमग्न व्हावे तसेच पुनर्वसनाची व्याप्ती कमी व्हावी यासाठी प्रकल्पाचे बांधकाम विर्डी गावठाणाजवळ कट्टिका नाल्यावर (हलतर नाल्याचा उपनाला) पर्यायी धरणस्थळी हाती घेण्यात आले.

महादयी पाणी तंटा लवादा समोरील सुनावणी विचारात घेता व सद्यस्थितीत महादयी खोऱ्यातील महाराष्ट्राचा हा एकमेव बांधकामाधीन प्रकल्प असून महादयी नदी खोऱ्यातील राज्याच्या हद्दीतील पाणी वापराचे अधिकार/राज्याचे हितसंबंध अबाधित ठेवण्यासाठी प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले असून सदर प्रकल्पामुळे सिंधुदूर्ग जिल्हयातील १३४५ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

बांधकामा दरम्यान भू-संपादन खर्चातील वाढ, संकल्पचित्रातील बदलामुळे बांधकामाची झालेली किंमत वाढ, दरसूचीतील दरात झालेली वाढ इत्यादी कारणांमुळे प्रकल्प किंमतीत वाढ झाली. त्यामुळे कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ यांनी सन २०१३-१४ चे दरसूचीवर आधारित प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर केला आहे.

त्यानुसार विर्डी बृहत ल.पा योजना, ता. दोडामार्ग जि. सिंधुदूर्ग या योजनेचा प्रथम सुधारित प्रकल्प अहवालास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाचे सहमतीने दिनांक ०३.१०.२०१७ रोजी झालेल्या मा. मंत्रीमंडळाचे बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आला होता. त्यानुसार मंत्रीमंडळाच्या मंजूरीने सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय:-

विर्डी बृहत ल.पा योजना, ता. दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग, या योजनेच्या रु. १४५.९९६ कोटी (रुपये एकशे पंचेचाळीस कोटी नव्याण्णव लक्ष साठ हजार) या किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत

आहे. प्रत्यक्ष कामासाठी एकूण रुपये १३४.५१६ कोटी (रुपये एकशे चौतीस कोटी एक्कावन्न लक्ष साठ हजार फक्त) व अनुषंगिक खर्च रुपये ११.४८ कोटी (रुपये अकरा कोटी अठ्ठेचाळीस लक्ष फक्त) आहे. अंदाजपत्रकात उर्वरित कामासाठी जलसंपदा विभागाच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षनिहाय तरतुदींचा गोषवारा सोबत परिशिष्ट-"अ" मध्ये जोडला आहे.

२) या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय-३, मुख्य लेखाशिर्ष,"४७०२ लहान पाटबंधारे यावरील भांडवली खर्च -८०, सर्वसाधारण , १९०,सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका,(००) सार्वजनिक व इतर क्षेत्रातील गुंतवणूका, (००)(०२) कोकण पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (लपा) (४७०२ ४९०९) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो प्रतिवर्षाच्या शासनाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३) या योजनेस प्रदान करण्यात आलेली सुधारित प्रशासकीय मान्यता १७० अनुक्रमांकावर नोंदवण्यात आली आहे.

४) सदर शासन निर्णय दिनांक ०३.१०.२०१७ रोजी झालेल्या मा. मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११६११४६४७३३२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सोबत :- परिशिष्ट "अ"

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42153c779eba7d6ca17364b6d37857b105b20a01d36c767c7ed1d7d278837bd7, cn=Dharane Mallikarjun Irappa
Date: 2017.11.16 11:49:22 +05'30'

(म. ई. धरणे)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
२. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
३. वित्त विभाग (व्यय-१२), मंत्रालय, मुंबई ३२
४. नियोजन विभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई ३२.
५. कार्यकारी संचालक, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
६. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश मुंबई.
७. (सोबत सुधारित प्रशासकीय मान्यतेची परिनिरीक्षण टिप्पणी जोडली आहे)
८. आंतर वित्त सल्लागार व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग.
१०. अधीक्षक अभियंता, दक्षिण कोंकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ,ओरोस,सिंधुदूर्गनगरी.
११. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, ओरोस,सिंधुदूर्गनगरी.
१२. अर्थशाखा १/२ (२ प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई. (२ प्रती)
१४. खारभूमी, संग्रहार्थ.

परिशिष्ट-अ

शासन निर्णय क्र. : संकीर्ण २०१४/(११३/२०१४)/खारभूमी, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७ चे परिशिष्ट

विर्डी बृहत ल.पा योजना, ता. दोडामार्ग, जिल्हा सिंधुदूर्ग च्या प्रकल्प अहवालास रु.१४६.०० कोटी इतक्या किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

<u>उपशिर्षवार प्रशासकीय मान्यतेचा तपशिल</u> (रू. कोटी)

अ.क्र.	तपशिल	प्रथम प्र.मा. रक्कम कोटी
१	अ- प्राथमिक	०.७५
२	ब- जमीन	१३.६७
३	क- कामे, धरण, सांडवा	८८.९४
४	डी- विमोचक	९.१७
५	के- इमारती	०.२०
६	एम-वृक्षारोपण	०.००६
७	ओ- संकिर्ण	०.२१
८	पी- देखभाल	०.३८
१०	आर- दळणवळण	०.३३
११	मुख्य कालवा व वितरीका	१८.९८
१२	पेनस्टॉक	१.८८
एकूण		**१३४.५१६**
अनुषंगिक खर्च		११.४८
एकुण		**१४५.९९६**

ठळक बाबी

अ) योजनेचे सिंचन क्षेत्र - १३४५ हेक्टर आहे.
ब) योजनेमुळे एकूण होणारा पाणीसाठा - १४.८३४ द.ल.घ.मी. आहे.
क) प्रति सहस्त्र घनमीटर पाणीसाठा किंमत - रू. ९७,१५०/ स.घ.मी.
ड) लाभव्यय गुणोत्तर - १.२०>१

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42153c779eba7d6ca17364b6d37857b105b20a01d36c767c7ed1d7d278837bd7, cn=Dharane Mallikarjun Irappa
Date: 2017.11.16 11:49:33 +05'30'

(म. ई. धरणे)
शासनाचे उप सचिव